नि. दि. दा क्र. ०५/२०१०

**: निशाणी ८७ वर आदेश :**

(सी.एन.आर.क्र. एम.एच.ए.के.०७०००१५०२०१०)

१. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्ज अर्जदारांनी मयत वादी क्र. १ रामकृष्ण राघोजी शेगोकार यांचे वारसांना अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. परंतु सदर अर्ज कोणत्या कलमाखाली दाखल केला हे नमुद केले नाही. सदर अर्जातील मजकुर पाहता असे दिसून येते की, सदर अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश २२, नियम ३ प्रमाणे दाखल आहे. प्रतिवादींनी अर्जास हरकत घेतली व म्हटले की, अर्ज कायदेशीर नाही कारण वारस दाखला दिला नाही.

२. अभिलेख पाहिला असता प्रस्तुत दाव्यात वादी क्र. १ रामकृष्ण राघोजी शेगोकार हे दिनांक १२/१२/२०१९ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्याबाबतचा मृत्यु दाखल्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे. जरी वारस दाखला जोडला नसला तरी अर्जामध्ये शपथेवर नमुद आहे की, सदर नियोजित वारस हेच मयताचे वारस आहेत. अर्ज मुदतीत आहे. वरील परिस्थीतीत दावा चालविण्याचा हक्क शाबीत असल्याने वारसांना अभिलेखावर घेण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब अर्ज मंजुर करणे न्यायाचे हितास्तव आवश्यक झालेले आहे. सबब प्रस्तुत अर्ज खालील आदेशाप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**: आ दे श :**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मयत वादी क्र. १ रामकृष्ण राघोजी शेगोकार यांचे वारसांना वादी क्र. १/१ ते १/९ म्हणून अभिलेखावर घेण्यात येते.

३. वादी यांनी दाव्याच्या सरनाम्यात वारसांना अभिलेखावर घेवून दाव्याची दुरूस्त प्रत दाखल करावी.

४. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येतो.

Chandradip Pravinchandra Raghuvanshi

Digitally signed by Chandradip Pravinchandra Raghuvanshi
Date: 2020.01.24 17:08:16 +0530

बाळापुर. (चं. प्र. रघुवंशी)

दिनांक : २४.०१.२०२०. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बाळापुर.

**CETIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date | : | 24/01/2020. |
| Signed by Presiding Officer on | : | 24/01/2020. |
| Uploaded on | : | 24/01/2020. |

.........................................................................................................................